दै. देशोन्नती दि

# चोरीच्या ११ दुचाकी मुखेड पोलिस पथकाकडून जप्त; आरोपीस अटक



देशोन्नती वृत्तसंकलन...

**मुखेड** ■ मुखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकली चोरी गेल्याचे प्रकार मागील अनेक दिवसापासून घडत असताना चोरीच्या मोटारसायकली बाळगून विक्री करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या आरोपीस मुखेड पोलिस पथकाने सापळा रचून आटक केली आहे. सदर आरोपीकडून त्याच्या शेतात ठेवलेले विविध कंपनीच्या ११ मोटारसायकलसह सुमारे ३ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई १४ रोजी करण्यात आली असून या उघडकीस आल्याने मोटरसायकल चोरी गेलेल्या नागरिकांनी पोलिस ठाण्याकडे धाव घेतली आहे.

तालुक्यात अनेक दिवसापासून मोटारसायकल चोरीचे प्रकार घडत आहेत, याबाबतच्या अनेक तक्रारी पोलिस ठाण्यात दाखल झाल्या असताना नागरिक चिंतेत होते. दरम्यान पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन येवती शिवारात एका शेतात ११ चोरीच्या मोटारसायकली असल्याचे समजल्यावरुन पोलिसांनी सापळा रचुन आरोपी रोहिदास माधव येवते (३०) रा. येवती यास अटक केली आहे. पोलिस खाक्या दाखवताच आरोपीने ११ मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. यावेळी पोलिसांनी येवती शिवारातील पळसवडी शिवारात चोरीस गेलेल्या ११ मोटारसायकली जप्त केल्या. आरोपी हा सदरच्या चोरी केलेल्या मोटारसायकली स्वस्त दरात विक्री करण्याचा घाट करीत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. यानंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या पथकात पोलिस निरीक्षक रमेश वाघ यांच्या नेतृत्वाखाली फौजदार गजानन अन्सापुरे, जमादार व्यंकट जाधव, चालक भास्कर मुंडे, पांडुरंग पाळेकर, किरण वाघमारे, सिद्धार्थ वाघमारे, मारोती मेकलवाढ आदींचा समावेश होता. कारवाईनंतर पोलिस निरीक्षक वाघ यांनी मुखेड पोलिसांनी ११ दुचाकी जप्त केला असून मुखेड परिसरात ज्या कुणाच्या दुचाकी चोरीला गेल्या आहेत त्यांनी कागदपत्रासह संबंधित पोलिस ठाण्यात हजर राहून शहानिशा करावी, असे आवाहन केले. दरम्यान चोरीच्या दुचाकी जप्त केल्याची माहिती मिळताच चोरीस गेलेल्या दुचाकीच्या मालकांनी पोलिस ठाण्यात गर्दी केली होती. (प्रतिनिधी)

दै. गोदातीर दि. 16/10/2023

# चोरलेल्या ११ दुचाकी जप्त; मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; एका आरोपीस अटक



**मुखेड–** मुखेड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्राच चोरी गेलेल्या ११ दुचाकी रविवारी जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच आरोपी रोहिदास माधव येवते यास अटक करण्यात आली आहे.

मुखेड पोलीस ठाण्या अंतर्गत दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या चोरीच्या घटनांचा तपास करतांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मुखेड पोलिसांनी येवती येथे रविवारी सापळा लावला. या सापळ्यात येवती येथील दुचाकी चोरटा आरोपी रोहिदास माधव येवते (वय ३०) हा अलगद अडकला. त्याचा अधिक चौकशी केली असता त्याच्या पळसवाडी येथील एका शेतातील आखाड्यावर चोरीच्या सर्व दुचाकी ठेवल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार शेतातील आखाड्यावरून ११ दुचाकी आढळून आल्या. या चोरीच्या दुचाकीची बाजार किंमत तीन लक्ष ६० हजार रुपये आहे. ह्या सर्व दुचारी जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपीविरुद्ध कलम १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोहेकॉ व्यंकट जाधव हे पुढील तपास करीत आहेत. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेश वाघ, पोउपनि गजानन अन्सपरे, पाहेकॉ व्यंकट जाधव, चालक पोहेकॉ भास्कर मुंडे, पोकॉ किरण वाघमारे, पोकॉ सिद्धार्थ वाघमारे, पोकॉ मारोती मेकलेवाड यांनी ही कामगिरी बजावली आहे.

वरील वर्णनाची कोणाची मोटारसायकल चोरीला गेली असल्यास पोलीस स्टेशन मुखेड येथे कागदपत्रांसह संपर्क साधावा, असे आवाहन मुखेड पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.